# मंत्रिमंडळ निर्णय

## दि. १ नोव्हेंबर २०१७

## ( बैठक क्र. १५१ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | लाभार्थ्यास प्रकल्पाच्या ५० टक्के अनुदान<br>**सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर ३०२ तालुक्यांत सघन कुक्कुट विकास गट** | पदुम |
| २ | **धंतोलीतील मैदानासाठी आरक्षित क्षेत्र आता मेट्रोच्या वाणिज्य वापरासाठी** | नगर विकास |
| ३ | **जिल्हा विधि सेवा प्राधिकरणावर राज्यात १८ पूर्णवेळ सचिवांची नियुक्ती** | विधि व न्याय |
| ४ | **उर्ध्व गोदावरी प्रकल्पास तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता** | जलसंपदा |
| ५ | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात दुरुस्ती<br>**कारखान्यांच्या ठोक अंशदानाबाबतची तरतूद वगळण्याचा शासनाचा निर्णय** | ग्रामविकास |
| ६ | महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमात सुधारणा<br>**स्वामित्वधनात सवलत देण्यासह विविध तरतुदींचा नव्याने समावेश** | महसूल |

<u>लाभार्थ्यास प्रकल्पाच्या ५० टक्के अनुदान</u>

**सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर**

**३०२ तालुक्यांत सघन कुक्कुट विकास गट**

परसातील कुक्कुटपालनास चालना देण्यासाठी राज्यातील ३०२ तालुक्यांत सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर सघन कुक्कुट विकास गटाची (Intensive Poultry Development Blocks) स्थापना करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या योजनेतून लाभार्थ्यास ५० टक्के म्हणजे ५ लाख १३ हजार ७५० रुपये अनुदान मिळणार आहे.

सध्या राज्यातील १६ जिल्ह्यांत शासकीय सघन कुक्कुट विकास प्रकल्प, चार ठिकाणी मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र आणि एका ठिकाणी बदक पैदास केंद्र कार्यरत आहे. तसेच सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर १४ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे २८ सघन कुक्कुट विकास गटांची स्थापना करण्याची प्रक्रिया सुरू आहे. असे प्रकल्प असणारे तालुके वगळून राज्यातील इतर ३०२ तालुक्यांमध्ये सघन कुक्कुट विकास गटांची स्थापना करण्यात येणार आहे. सन २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणाऱ्या प्रत्येक गटावर दोन हजार पक्ष्यांचा प्राथमिक समूह ठेवण्यासही आज मंजुरी देण्यात आली.

प्राथमिक समुहाचे संगोपन करण्यासाठी या योजनेंतर्गत राज्य शासनाकडून एक हजार चौ. फुटाच्या २ पक्षीगृहांचे बांधकाम, स्टोअर रूम, पाण्याची टाकी, विद्युतीकरण, खाद्य व पाण्याची भांडी, ब्रुडर, इतर उपकरणे व लसीकरण, लघु अंडी उबवणूक यंत्र तसेच ४०० उबवणुकीची अंडी, २० आठवडे वयाचे अंड्यावरील ५०० पक्षी, एकदिवसीय एक हजार मिश्र पिले, एकदिवशीय एक हजार पिलांसाठी २० आठवडे कालावधीपर्यंत पक्षी खाद्य पुरवठा, पक्षी खाद्य ग्राईंडर आणि एग नेस्ट्स यांच्या खरेदीसाठी लाभार्थ्याला अनुदान मिळणार आहे. दोन हजार अंड्यांवरील पक्ष्यांच्या प्राथमिक समूहाचे संगोपन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या खरेदीसाठी सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना राज्य शासनाचे ५० टक्के म्हणजे ५ लाख १३ हजार ७५० रुपये अनुदान देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासह अनुदानासाठी आवश्यक असणाऱ्या एकूण १५ कोटी ५८ लाख ३३ हजार रुपये एवढ्या निधीस आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या योजनेंतर्गत संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सहा सदस्यांच्या समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. सध्यस्थितीत कुक्कुटपालन व्यवसाय करणारे सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व जनजाती क्षेत्र उपयोजनेतील लाभार्थी तसेच लघु अंडी उबवणूक यंत्र असणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी निवडताना ३० टक्के महिला लाभार्थ्यांना विशेष प्राधान्य राहील. निवडलेल्या लाभार्थ्यांना कुक्कुटपालन विषयक ५ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या कुक्कुट प्रकल्पांमध्ये देशी कोंबड्यासारखे दिसणारे रंगीत व रोगप्रतिकारक क्षमता असलेले गिरीराज, वनराज, सातपुडा, सुवर्णधारा, ग्रामप्रिया यासारख्या सुधारित पक्ष्यांचे सेंट्रल रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेने संशोधित केलेल्या लो इनपूट टेक्नॉलॉजीच्या सहाय्याने संगोपन केले जाईल.

या गटांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी तथा पशुपालक, महिला स्वयंसहाय्यता गट, सुशिक्षित बेरोजगार यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच गाव पातळीवरील छोट्या कुक्कुट व्यावसायिकांना परसातील कुक्कुटपालनासाठी सहजगत्या एक दिवसीय कुक्कुट पक्षी उपलब्ध होतील. उत्पादित अंडी व पक्ष्यांच्या विक्रीतून व्यावसायिकांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होणार असून

त्यांच्यासाठी शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण होणार आहे. या योजनेमुळे दैनंदिन आहारात प्रथिनयुक्त आहाराचा समावेश होऊन कुपोषणावर मात होण्यास मदत होईल. भविष्यात कुक्कुट मांसास वाढती मागणी राहणार असून या योजनेमुळे मांसाची मागणी व पुरवठा यामधील तफावत दूर करणे शक्य होणार आहे. विविध केंद्र पुरस्कृत, राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय योजनांसाठी हे प्रकल्प मातृसंस्था म्हणून काम पाहू शकतील व त्यासाठी नव्याने गुंतवणूक करावी लागणार नाही. त्यामुळे या प्रकल्पांना विविध योजनांसाठी उबवणुकीची अंडी, एकदिवसीय पिल्ले, तलंगा व नर वाटपासाठी अधिक वाव राहील. याव्यतिरिक्त लाभार्थ्यास नर कोंबडे, तलंगांची विक्री, रिकामी पोती, पोल्ट्री मॅन्यूअर व ७२ आठवड्यानंतरचे कल्ड पक्ष्यांची (पूर्ण वाढ झालेले) विक्री यामधून देखील उत्पन्न मिळणार आहे.

-----०-----

नगर विकास विभाग

## धंतोलीतील मैदानासाठी आरक्षित क्षेत्र आता मेट्रोच्या वाणिज्य वापरासाठी

नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेनुसार मौजा धंतोली येथील भूखंड खेळाच्या मैदानासाठी आरक्षित ठेवण्यात आला होता. मात्र, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी तो आवश्यक असल्याने आरक्षणात फेरबदल करून तो वाणिज्य वापरासाठी खुला करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मौजा धंतोली येथील खसरा क्रमांक ९८ ते १०१, सि.स. क्र.९ क्षेत्र १९८८९.९० चौरस मीटर क्षेत्र खेळाच्या मैदानामधून वगळण्यात येत असून ही वगळलेली जागा मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या वाणिज्य वापरासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची सोय होणार असून या प्रकल्पाशी संबंधित कामाला गती मिळणार आहे.

-----०-----

## जिल्हा विधि सेवा प्राधिकरणावर
## राज्यात १८ पूर्णवेळ सचिवांची नियुक्ती

राज्यातील १८ जिल्ह्यातील जिल्हा विधि सेवा प्राधिकरणासाठी पूर्णवेळ सचिव पद निर्माण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यात पर्यायी तक्रार निवारण केंद्रे निर्माण होण्याबरोबरच विधिविषयक जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविता येणार आहेत.

विधि सेवा प्राधिकरण अधिनियम-१९८७ नुसार राज्यात महाराष्ट्र विधि प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून जिल्हास्तरावर जिल्हा विधि सेवा प्राधिकरण कार्यरत आहेत. राज्यातील १५ जिल्ह्यातील जिल्हा विधि सेवा प्राधिकरणांवर यापूर्वीच पूर्णवेळ सचिव कार्यरत आहेत. या प्राधिकरणामार्फत महालोकअदालत, राष्ट्रीय लोकअदालती, विधि साक्षरता शिबीरे आणि विविध प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करणे, त्याबरोबरच पात्र व्यक्तींना तसेच तुरुंगातील कैद्यांना विधि सहाय्य पुरविणे यासह विविध जबाबदाऱ्या पार पाडण्यात येतात. सध्या ज्या जिल्ह्यात पूर्णवेळ सदस्य सचिव कार्यरत नाहीत तेथे जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हे न्यायालयाचे काम सांभाळून सदस्य सचिव पदाची जबाबदारी सांभाळतात.

बदलत्या परिस्थितीनुसार प्राधिकरणावरील कामाचा ताण वाढत असल्याने पूर्णवेळ सचिव निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यानुसार राज्यातील अमरावती, बीड, भंडारा, बुलढाणा, नंदुरबार, गडचिरोली, गोंदिया, जालना, वाशिम, उस्मानाबाद, परभणी, रायगड, सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग, वर्धा, मुंबई उपनगर या जिल्ह्यांमध्ये जिल्हा विधि सेवा प्राधिकरणासाठी पूर्णवेळ सचिव पदाची निर्मिती करण्यात आली आहे.

-----o-----

## उर्ध्व गोदावरी प्रकल्पास तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता

नाशिक जिल्ह्यातील उर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी ९१७ कोटी ७४ लाख रुपयांच्या तृतीय सुधारित प्रशासकीय प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या मान्यतेमुळे येत्या दोन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण होणार आहे.

उर्ध्व गोदावरी प्रकल्पापासून नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण ७४ हजार २१० हेक्टर सिंचन क्षेत्राची निर्मिती होणार आहे. १९६६ मध्ये १४.२९ कोटी रुपये खर्चाची मूळ प्रशासकीय मान्यता मिळालेल्या या प्रकल्पाला १९९९ मध्ये १८९.९८ कोटी रुपयांची प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर पुन्हा २००८ मध्ये ४३९.१२ द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. मात्र, दरसूचीतील बदल, भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ, सविस्तर संकल्पनेनुसार करण्यात आलेल्या वाढीव तरतुदी आदींमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

या प्रकल्पांतर्गत सर्व मुख्य धरणांचा पाणीसाठा पूर्ण झाला आहे. जून २०१६ अखेर एकूण ७१ हजार ५५१ हेक्टर सिंचन क्षेत्राची निर्मिती झाली असून २ हजार ३७६ सिंचन क्षमता निर्माण होणे शिल्लक आहे. या प्रकल्पावर सिंचनविषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालात दोषयुक्त प्रकल्प म्हणून आक्षेप आहेत. यामुळे सिंचनविषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालातील शासनाच्या कार्यपालन अहवालातील मुद्यांबाबत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने फेरतपासणी केली. द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेतील मांजरपाडा वळण योजना अंतर्गत वाघाड करंजवण जोड बोगदा, स्वतंत्र अंबड वळण योजना आणि चिमणपाडा वळण योजना यांना राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या शिफारशीअंती वगळण्यात आले आहे.

या योजना वगळल्यानंतर उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकाची किंमत ९१७ कोटी ७४ लाख रुपये आहे. या प्रकल्पावर मार्च २०१७ अखेर ६२८ कोटी १ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. उर्वरित कामांची किंमत एकूण २८९ कोटी ७३ लाख रुपये इतकी आहे. हा प्रकल्प येत्या दोन वर्षांत पूर्ण करण्यासाठी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

----०----

<u>महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात दुरुस्ती</u>

**कारखान्यांच्या ठोक अंशदानाबाबतची**
**तरतूद वगळण्याचा शासनाचा निर्णय**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १२५ मधील पंचायतीच्या क्षेत्रातील कारखान्यांनी संबंधित पंचायतींना ठोक रकमेच्या स्वरुपात अंशदान देण्याबाबतची तरतूद वगळण्यासह कलम १७६ च्या पोट कलम (२) च्या खंड (२७) अन्वये कलम १२५ च्या संदर्भात नियम करण्याची असलेली तरतूद वगळण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम-१९६० नुसार औद्योगिक आणि व्यावसायिक प्रयोजनामुळे संबंधित ग्रामपंचायतीच्या मूलभूत सोयी-सुविधांवर अतिरिक्त ताण पडत असल्यामुळे वाणिज्यिक, व्यावसायिक, औद्योगिक प्रयोजनासाठी यापूर्वी निवासी वापराच्या दुप्पट दराने मालमत्ता कर आकारणी करण्यात येत होती. मागील तीन वर्षातील किंवा कारखाना सुरु झाल्यापासूनच्या मुदतीतील चुंगी (जकात) बसविल्यामुळे वसूल झालेले सरासरी शुल्क, सामान्य आरोग्य रक्षण कर व सामान्य पाणीपट्टीपासून मिळणारे शुल्क व इतर कर बसविल्यामुळे मिळणारे शुल्क असे एकत्रित शुल्क विचारात घेऊन त्याच्या ५० ते ७० टक्के मर्यादेपर्यंत कारखान्यांकरीता ठोक रकमेची अंशदानाची रक्कम निश्चित करण्यात येत होती.

ठोक करार करण्यासाठी कारखानदाराने किमान मागील तीन वर्षातील किंवा कारखाना सुरु झाल्यापासूनच्या मुदतीतील पंचायतीकडून बसविण्यात आलेल्या प्रत्येक बाबतीत पंचायतीस दिलेले शुल्क व चालू वित्तीय वर्षात प्रत्येक कराच्या बाबतीत द्यावयाच्या शुल्काचा तपशील देणे आवश्यक होते. यासोबतच कारखानदाराने कारखान्यात उभारलेल्या सुविधा आणि ग्रामपंचायत त्यांच्या हद्दीत देत असलेल्या सुविधा आणि कारखाना सुरु झाल्याच्या मुदतीपासून कारखान्यात उभारलेल्या सुविधा असा सर्व सुविधांवरील खर्चांचा तपशील सादर करणेही आवश्यक होते.

ठोक करार करण्याकरिता लागणारा कालावधी व त्यासाठी राबविण्यात येणारी पद्धती ही वेळखाऊ, किचकट व क्लिष्ट होती. तसेच अशा रकमेचा हिशेब करताना दिलेल्या मर्यादा व सुखसोयी याबाबत भेद करण्यास वाव होता. परिणामी ठोक करार अंमलात येण्यामध्ये अडचणी येत होत्या.

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम-१९६० मध्ये सुधारणा करण्यात येऊन भांडवली मुल्यावर आधारित मालमत्ता कर आकारणी करण्याबाबत डिसेंबर २०१५ मध्ये अधिसूचना जारी करण्यात आली. या अधिसूचनेनुसार पूर्वी असलेल्या निवासी वापराच्या निर्धारित दराच्या दुप्पट दराऐवजी औद्योगिक वापरासाठी निवासी वापराच्या १.२० पट असे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. हे निश्चित झालेले प्रमाण तसेच कर प्रणालीचे सुलभीकरण व राज्यात सध्या जकात कर लागू नसल्याने आज महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १२५ मधील कारखान्यांनी ठोक रक्कमेच्या स्वरूपात अंशदान देण्याबाबतची तरतूद वगळण्यास आणि कलम १७६ च्या पोटकलम (२) च्या खंड (सत्तावीस) अन्वये कलम १२५ संदर्भात नियम करण्याची असलेली तरतूद वगळण्यास तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्यांनी ठोक रक्कमेच्या स्वरूपात अंशदान देण्याबाबत) नियम-१९६१ वगळण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

<u>महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमात सुधारणा</u>

## स्वामित्वधनात सवलत देण्यासह
## विविध तरतुदींचा नव्याने समावेश

गौण खनिजाचा वापर त्याच ठिकाणी करताना स्वामित्वधनात सवलत देण्यासह संबंधित प्रक्रियेत अधिक सुटसुटीतपणा आणण्यासाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमात विविध तरतुदींचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

आजच्या निर्णयानुसार महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम-२०१३ मध्ये विविध सुधारणा करण्यात आल्या आहेत. भूखंडाचा विकास करताना निघणाऱ्या मातीचा वापर सपाटीकरणासाठी अथवा अन्य कामासाठी त्याच भूखंडावर केल्यास स्वामित्वधन आकारणीतून सूट देण्यात येते. त्याच धर्तीवर जमीन खोदून पाईपलाईन्स आणि केबल्स टाकताना निघालेली माती त्याच ठिकाणी वापरण्यात येत असल्यास अशा मातीवरील स्वामित्वधनात सूट देण्याचा निर्णय आज घेण्यात आला. तसेच शासनाच्या महत्त्वाच्या सार्वजनिक प्रकल्पासाठी उत्खनन करण्यात येत असलेल्या गौण खनिजावरील स्वामित्वधन माफ करणे किंवा त्याचे दर कमी करण्याचा प्रकरणपरत्वे अधिकार शासनाला राहणार आहे.

रेल्वेमार्ग, जलाशय, कालवा, नदी, नाला, पाटबंधारे यांच्या कामांसह रस्ता, पूल, इमारती किंवा सार्वजनिक बांधकामे यांच्या हद्दीपासून शासन निश्चित करेल त्या अंतराच्या आत कोणत्याही ठिकाणी कोणतेही खाणकाम करता येणार नाही. अशा तरतुदी करण्यासही मंजुरी देण्यात आली. या कामासाठी दिलेल्या मंजुरीची मुदत व खाणकाम संपुष्टात आल्यानंतर त्या खाणींचा वापर पावसाचे पाणी साठविणे, मत्स्य व्यवसाय व जलक्रीडा यासाठी करण्यासह घनकचरा व्यवस्थापनासाठी डंपिंग ग्राउंड म्हणून करणे शक्य होणार आहे. अशा प्रकारची नवीन तरतुद या नियमात समाविष्ट करण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने आता असा वापर करता येणार आहे.

प्रत्येक खनिपट्टाधारकाने गौण खनिजाच्या वाहतुकीच्या वाहनासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नमुन्यातील बारकोडयुक्त वाहतूक पास दोन प्रतीत ठेवणे आवश्यक आहे. खनिपट्टाधारक दुय्यम प्रत स्वत:जवळ एक वर्षापर्यंत ठेवील. तसेच खरेदीदारास पासची मूळ प्रत गौण खनिज स्वीकारताना देणे आवश्यक राहील.

गौण खनिजाचे उत्खनन करणे, हलविणे, गोळा करणे, दुसऱ्या जागी नेणे, उचलून घेणे किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वैध प्राधिकार किंवा परवानाधारकाकडून खरेदी करण्यात येत असल्याची खात्री व्यापारी परवानाधारकाकडून (Dealer Licence Holder) होणे आवश्यक आहे. व्यवसायाच्या ठिकाणी गौण खनिज उतरवून घेताना मूळ वाहतूक पास घेऊन एक वर्षापर्यंत संरक्षित ठेवणे गरजेचे आहे. तसेच सक्षम अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने मागणी केल्यावर सादर करणेही बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे मंजूर केलेल्या खाणपट्टा परवान्याची सविस्तर माहिती जनतेसाठी खुल्या असलेल्या जागेत आणि सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावणे खाणपट्टाधारक, खाणकाम परवानाधारक, खनिजाचा साठा व विक्रीचा परवानाधारक व्यापारी यांना सक्तीचे करण्यात आले आहे.

सार्वजनिक जमिनीवरील गौण खनिपट्टे जाहीर लिलावाद्वारे मंजूर करण्याची कार्यपद्धती देखील निश्चित करण्यात आली आहे. गौण खनिज म्हणून वर्गीकरण झालेल्या ज्या प्रमुख खनिजांच्या खाणपट्ट्यांसाठी पूर्वेक्षणाची परवानगी मिळाली असेल किंवा खाणपट्टा मंजूर झाला असेल तथापि, खाणपट्ट्याची अंमलबजावणी अपूर्ण असेल अशा प्रकरणांना लिलावाची पद्धत लागू राहणार नाही. तसेच

खाजगी जमीन मालकास त्याच्या स्वत:च्या नावाने स्वत:च्या जमिनीवर मंजूर करावयाचे खनिपट्टे जाहीर लिलावातून वगळण्यात आले असून त्या ठिकाणी अर्जाद्वारे मंजुरी देण्यात येणार आहे. मात्र, खाजगी जमीन मालक अन्य व्यक्तीस किंवा संस्थेस खनिपट्ट्यासाठी जमीन देत असल्यास असे खनिपट्टे जाहीर लिलावाद्वारेच मंजूर करून भूपृष्ठभाड्याची रक्कम जमीन मालकास देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वडार व कुंभार समाजाच्या परंपरिक व्यवसायासाठी अर्जाद्वारे खनिपट्टे किंवा परवाने मंजुर करण्याची पद्धत यापुढेही चालू ठेवण्यात येणार आहे.

जमिनीच्या एखाद्या भूखंडाचा विकास करण्यासाठी उत्खनन करणे आवश्यक असेल, त्यावेळी नियोजन प्राधिकारी किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडून आवश्यक ती परवानगी घेणे आवश्यक असेल. त्यानंतर प्रकल्प प्रस्तावकाने अशा उत्खननाबाबत जिल्हाधिकाऱ्यांना आगाऊ कळविण्यासह उत्खननासाठी आवश्यक असलेल्या स्वामित्वधनाच्या रकमेचा शासनास आगाऊ भरणा केला असल्यास त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक असणार नाही.

-----o-----